॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. २५ जुलै ( प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे विविध शैक्षणिक वर्षांत उत्तीर्ण झालेल्या परंतु अद्याप पदवी प्रमाणपत्र न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यापीठाकडे पडून असलेली तब्बल ६ हजार ३५३ अवितरीत पदवी प्रमाणपत्रे संबंधित विद्यार्थ्यांना वाटप करण्यासाठी विशेष उपक्रम राबवला जात आहे.

विद्यापीठाचा ३४ वा दीक्षांत समारंभ नुकताच २३ डिसेंबर २०२५ रोजी पार पडला. आतापर्यंत आयोजित ३४ दीक्षांत समारंभानंतर अनेक विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे विद्यापीठाकडेच जमा आहेत. यात प्रामुख्याने टपालाने पाठवलेली मात्र पत्ता न सापडल्याने परत आलेली प्रमाणपत्रे, विद्यार्थ्यांनी अर्जासोबत गुणपत्रकाची छायांकित प्रत न जोडणे, पात्रतेअभावी किंवा आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे राखीव ठेवलेली प्रमाणपत्रे विद्यापीठाकडे पडून आहेत.

ही प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक व नोकरीविषयक कामात उपयोगी पडावीत, या उद्देशाने विद्यापीठाने सर्व ६ हजार ३५३ प्रलंबित प्रमाणपत्रांची सविस्तर यादी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर (nmu.ac.in) प्रसिद्ध केली आहे. तसेच सर्व संलग्नित महाविद्यालयांना पत्र पाठवून संबंधित विद्यार्थ्यांपर्यंत माहिती पोहोचवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज करूनही पदवी प्रमाणपत्र घेतलेले नाही, त्यांनी संकेतस्थळावरील यादीत आपले नाव तपासावे. त्यानंतर अंतिम वर्षाच्या गुणपत्रकाची सत्यप्रत (Attested Copy) आणि ओळखपत्र दाखवून विद्यापीठाच्या पदवी प्रमाणपत्र विभागातून आपले प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील यांनी आवाहन केले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव, दि. २५ जुलै ( प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संशोधन विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या पेट (PET)-2026 परीक्षेचे अधिकृत वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून, दि. २४ जुलै पासून ऑनलाइन अर्ज प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. पीएच.डी. प्रवेशासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांना निर्धारित कालावधीत ऑनलाइन अर्ज सादर करण्याचे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

विद्यापीठातर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया दि. २४ जुलै २०२६ पासून सुरू झाली असून अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २४ ऑगस्ट २०२६ आहे. त्यानंतर अर्जांची छाननी करून १७ सप्टेंबर २०२६ रोजी उमेदवारांना हॉल तिकीट (प्रवेशपत्र) ऑनलाइन उपलब्ध करून दिले जाणार आहे.

पेट-२०२६ प्रवेश परीक्षा २३ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्जाची हार्ड कॉपी १६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत संबंधित विभागाकडे सादर करणे आवश्यक राहणार आहे.

पेट परीक्षेतून सूटकरिता देखील विद्यापीठाच्या वेबसाइट वर सविस्तर माहिती व वेळापत्रक देण्यात आले आहे. विद्यापीठाने स्पष्ट केले आहे की, PET-2026 साठीचे सर्व अर्ज केवळ ऑनलाइन पद्धतीनेच स्वीकारले जाणार आहेत. उमेदवारांनी अर्ज भरताना सर्व माहिती अचूकपणे भरावी तसेच आवश्यक कागदपत्रे नियमानुसार अपलोड करावीत. हॉल तिकीट उमेदवारांच्या लॉगइनमध्ये उपलब्ध करून दिले जाणार आहे.

पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांसाठी पेट (PET) ही अनिवार्य प्रवेश परीक्षा असल्याने इच्छुक उमेदवारांनी अंतिम तारखेची वाट न पाहता वेळेत ऑनलाइन अर्ज भरावेत, असे आवाहन विद्यापीठाच्या संशोधन विभागामार्फत करण्यात आले आहे.

.........................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २५ जुलै, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता